नि.फौ.मा.क. ६१५/२००८
सरकार -वि- विनायक व १
**न्यायनिर्णय नि.क.५२**

दाखल तारीख १३/०९/२००७
नोंदणी तारीख १३/०९/२००७
निकाल तारीख ३१/०३/२०२६
कालावधी १८वर्षे,०६म.,१८दि.

**भाग अ**
**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**
**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (१)}**

| | |
|---|---|
| | **निशाणी क.५२** |
| **कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी यांचे न्यायालय**<br>पिठासीन अधिकारी :- योगेश्वर ज. वळवी | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क. ७०/२००७<br>चामोर्शी पोलिस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | ३१/०३/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | नियमित फौजदारी खटला क्रमांक ६१५/२००८ |
| | CNR No.MAGA090000512007 |
| तक्रारकर्ता /अभियोग | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलिस ठाणे अधिकारी, पोलिस ठाणे चामोर्शी. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री.एस. एम. सलामे**<br>(सहायक सरकारी वकील) |
| आरोपी | १. विनायक माधव नरोटे,<br>वय २३, व्यवसाय- शेती,<br>रा. भिमनबोडी, पो. पेठतळा, ता.चामोर्शी, जि. गडचिरोली, |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री. ए. जे. उंदिरवाडे**<br>(आरोपीतर्फे वकील) |

**भाग ब**
**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (२)}**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०८/०५/२००७ |
| पहिल्या खबरीची तारीख | ०८/०५/२००७ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | १३/०९/२००७ |
| दोषरोपनिश्चीती तारीख | १०/०७/२०२५ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | २४/०७/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ३१/०३/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ३१/०३/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | ३१/०३/२०२६ |

**आरोपीबाबत तपशील**

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विनायक माधव नरोटे, | ०८/०५/२००७ व १६/०५/२०२५ | ०९/०५/२००७ | भा.दं.वि चे कलम ३२४ अन्वये | भा.दं.वि चे कलम ३२४ अन्वये दोषी | अंतिम आदेशा प्रमाणे | ३१९ दिवस |

| या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १९७२ | **पुरावा अधिनियम** |

**भाग क**

**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)}**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा.क्रं. १ | राजु माधव नरोटे | फिर्यादी |
| सा.क्रं. २ | मिनकुबाई माधव नरोटे | साक्षीदार |
| सा.क्रं. ३ | डॉ. अशोक विश्वनाथ गहाणे | वैद्यकिय अधिकारी |
| सा.क्रं. ४ | जयभद्र तानुजी आलाम | साक्षीदार |
| सा.क्रं. ५ | दौलत नारायण नागपुरे | तपासीक अधिकारी |

**ब. बचाव साक्षीदार, असल्यास :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा स्वरूप |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :**

| कमांक | नाव | पुराव्याचा स्वरूप |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| अ.क्रमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| १ | निशाणी/**पी-३४**/सा.क.१ | रिपोर्ट |
| २ | निशाणी/**पी-३५**/सा.क.१ | गुन्हयाचा प्राथमिक अहवाल |
| ३ | निशाणी/**पी-३८ व ३९**/सा.क.३ | तपासणीकरीता पत्र |
| ४ | निशाणी/**पी-४०**/सा.क.३ | दुखापतीबाबत प्रमाणपत्र |
| ५ | निशाणी/**पी-४१**/सा.कं.३ | वैद्यकिय प्रमाणपत्र |
| ६ | निशाणी/**पी-४२**/सा.क.३ | हत्याराबाबत अभिप्राय मिळण्याबाबत पत्र |
| ७ | निशाणी/**पी-४५**/सा.क.५ | घटनास्थळ पंचनामा |
| ८ | निशाणी/**पी-४६**/सा.क.५ | जप्तीपत्रक |
| ९ | निशाणी/**पी-४७** व ४८/सा.क.५ | अटक फार्म |
| १० | निशाणी/**पी-४९** व **५०**/सा.क.५ | आरोपीचे तपासणीकरीता पत्र |

**ब. बचावपक्ष :**

| अ.क्रमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| **--निरंक--** | | |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| अ.क्रमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| **--निरंक--** | | |

**ड. महत्वाच्या वस्तु :**

| अ.क. | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| १ | वस्तुचिन्ह अ | काठी |

**न्यायनिर्णय**

( दिनांक **३१ मार्च २०२६** रोजी घोषीत)

**१.** आरोपीवर भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ अन्वये आरोप ठेवुन खटला चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त रुपात खालीलप्रमाणे आहे :

अ) दि.०८.०५.२००७ रोजी राजु माधव नरोटे (जखमी) यांनी चामोर्शी पोलीस स्टेशनला खबर दिली की, दि. ०८.०५.२००७ रोजी अंदाजे सकाळी ०८.०० च्या

सुमारास तो त्याच्या शेतातील झाडांचे पाने तोडीत असतांना त्याचे वडील नामे माधव नरोटे त्याच्या जवळ आले व त्याला शिवीगाळ करून तुला फक्त मी शेती हिस्यामध्ये दिली आहे, झाडे दिलेली नाही, तु पाने तोडु नकोस असे म्हणाला. तेव्हा त्यांने त्यांचे न ऐकल्याने ते त्याला शिवीगाळ करीत त्याच्या घरी गेला व त्याच्या घरातील कवेलु फेकु लागला. तेव्हा तो व त्याची आई पाने तोडणे सोडुन त्यांच्या घरी येवुन त्याच्या वडिलास घर तिने बांधले आहे, तु कश्याला कवेलु फेकतोस असे म्हणाली असता त्याला मारपीट करून जोराने ओरडुन सावत्र आईचा मुलगा विनायक माधव नरोटे याला आवाज दिल्याने विनायक नरोटे हा कु-हाडीचा दांडा घेवुन धावत आला व त्याच्या डोक्यावर मारल्यामुळे त्याचे डोके फुटले तेव्हा आई नामे मिनकुबाई हिने सोडविण्याचा प्रयत्न केला असता तिला देखील विनायकने त्याच दांडयानी डोक्यावर मारल्याने आईचे देखील डोके फुटले. सदर मारपीट दरम्यान वडीलांनी देखील त्याला व आईला मारपीट केली.

**३.** सदर तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन चामोर्शी येथे भा.दं.वी चे कलम ३२४ सह कलम ३४ नुसार अपराध क्र. ७०/२००७ अन्वये आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला. चामोर्शी पोलीस स्टेशनचे सहायक फौजदार दौलत नारायण नागपुरे यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**४.** आरोपी क्रं.२ हा खटला प्रलंबित कालावधीत मयत झाल्याने आरोपी क्रं.२ विरूध्द खटला संपुष्टात आला. आरोपी क्रं.१ विरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ सह कलम ३४ च्या गुन्हयासाठी नि.क्र.३१ वर आरोप निश्चित करण्यात आले. आरोपीला दोषारोप वाचुन व मराठीमध्ये समजावून सांगीतले असता त्याने दोषारोप अमान्य केला व खटला पुढे चालविण्याची तयारी दर्शीविली. अभियोग पक्षातर्फे सदर प्रकरणात ५ साक्षीदार तपासण्यात आले. नि.क्र. ०१ वर आदेश पारित करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. फौजदारी प्रकिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्रं.५१ वर नोदंविण्यात आले. त्यात आरोपीचा बचाव नकाराचा आहे.

**५.** सरकारी पक्षाची हकीकत, अभिलेखावर आलेला तोंडी व लेखी पुरावा, उभय पक्षांचा युक्तीवाद यावरुन निराकरणासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात. सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०८/०५/२००७ रोजी सकाळी ०८:०० वाजताच्या दरम्यान मौजा भिमनबोडी, तह.चामोर्शी, जि. गडचिरोली येथे आरोपी क्रं.१ विनायक माधव नरोटे यांने मयत आरोपी क्रं.२ माधव गुरखु नरोटे यांच्याशी संगनमत करून राजु नरोटे व त्याची आई मिनकुबाई नरोटे यांना कु-हाडीच्या दांडयाने डोक्यावर मारून इच्छापुर्वक दुखापत पोहोचविली आणि त्याद्वारे आरोपी क्रं.१ यांने भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | होकारार्थी |
| २. | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

## मुददे क्रं. १ व २ करीता.

**६.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी फिर्यादी साक्षीदार क्र.१ राजु माधव नरोटे याला नि.क्र.३३ वर, साक्षीदार क्र.२ मिनकुबाई माधव नरोटे हिला नि.क्र.३६ वर, वैद्यकिय अधिकारी साक्षीदार क्रं.३ डॉ. अशोक विश्वनाथ गहाने यांना नि.क्रं.३७ वर, साक्षीदार क्र.४ जयभद्र तानुजी आलाम याला नि.क्र.४३ वर आणि तपासी अधिकारी साक्षीदार क्रं.५ दौलत नारायण नागपुरे यांना नि.क्रं.४४ वर तपासले.

**७.** फिर्यादी साक्षीदार क्रं.१ राजु माधव नरोटे याने त्याच्या साक्षीमध्ये कथन केले की, आरोपी हा त्याच्या सावत्र आईचा मुलगा आहे. सन २००७ मध्ये मारपीट झाली होती. त्याच्या वडिलांनी त्याच्या हिस्स्यात दिलेल्या जमीनीमध्ये तेंदु पानाचे झाड होते. तो व त्याची आई तेंदु पान तोडण्यासाठी गेले असता त्याचे वडिल व विनायक यांनी तेंदु पान तोडु दिले नाही व त्याला मारहाण केली. विनायकने त्याला बांबुच्या दांडयाने डोक्यावर मारले. त्याच्या आईला देखील डोक्यावर मारले. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला. रिपोर्ट नि.क्रं.३४ वर त्यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावरून गुन्हा नोंद करण्यात आला होता. गुन्हयाचा प्राथमिक अहवाल नि.क्रं.३५ वर त्यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांना उपचारासाठी सरकारी दवाखाना घोट येथे घेवुन गेले होते. काठी वस्तुचिन्ह अ सदर साक्षीदाराने ओळखली.

आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलट-तपासात त्यांनी मान्य केले की, आरोपी हा

त्याचा सावत्र भाउ आहे व त्यांचा एकमेकांवर राग आहे व त्यांची शेती वडिलोपार्जित आहे. त्यांनी पुढे मान्य केले आहे की, त्याला त्याच्या हिस्यात कोणती जमीन व किती तेंदुचे झाडे होती याची माहिती नव्हती व त्याला वाटले की, ते त्याच्या हिस्याचे तेंदुची पाने तोडत होते. त्यांनी पुढे मान्य केले की, ही सर्व बाचा-बाची त्यांच्या शेतात झाली व शेतामध्ये घसरण असते. बाचाबाचीमध्ये ढकल्यामुळे ते खाली पडल्याने त्याला डोक्याला दुखापत झाली ही सुचना सदर साक्षीदाराने नाकारली आहे. तसेच शंकेवरून फिर्याद दाखल केल्याची सुचना देखील सदर साक्षीदाराने नाकारली आहे.

८. साक्षीदार क्रं.२ मिनकुबाई माधव नरोटे हिने तिच्या साक्षीमध्ये कथन केले की, तिच्या मुलाचे नाव राजु आहे. माधव नरोटे हा तिचा घरवाला होता. आरोपी विनायक हा तिच्या सवतीचा मुलगा आहे. घटना सन २००७ मध्ये घडली. त्यांना तिच्या पतीने शेतीचा हिस्सा दिला होता. त्या हिस्स्यामध्ये तेंदु पत्त्याचे झाड होते. तिच्या पतीने व विनायकने त्यांना तेंदु पत्ता तोडु नका असे म्हणुन मारहाण केली. विनायक याने तिला व तिच्या मुलाला बांबुच्या काठीने डोक्यावर मारले. तिच्या व राजुच्या डोक्यातुन रक्त आले. काठी वस्तुचिन्ह अ सदर साक्षीदाराने ओळखली.

आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलट-तपासात तिने मान्य केले की, आरोपी तिच्या सवतीचा मुलगा आहे व त्यामुळे तिचे एकमेकांशी पटत नव्हते. तिने पुढे मान्य केले की, आरोपी त्यांना जमीनीत येवु देत नव्हता व त्यावरून त्यांचे वाद होते. तिने पुढे मान्य केले की, त्या जमीनीवरून तिच्यामध्ये वाद झाला व त्यावरून विनायक व त्यांच्यात वाद झाला. तिने पुढे मान्य केले की, त्या धक्काबुक्की मध्ये ती पडली व ती पडल्यामुळे तिला व तिच्या मुलाला डोक्याला दुखापत झाली. तिने मान्य केले की, विनायक व त्याच्या वडिलांनी त्यांना मारले असे सांगुन तिने रिपोर्ट दिला. आरोपींनी तिला व तिच्या मुलाला काठीने डोक्यावर मारले हे खोटे कथन केल्याची सुचना सदर साक्षीदाराने नाकारली आहे.

९. वैद्यकिय अधिकारी साक्षीदार क्रं.३ डॉ. अशोक विश्वनाथ गहाणे यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, ते दि.०८.०५.२००७ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र घोट येथे वैद्यकिय अधिकारी म्हणुन कार्यरत होते. दि.०८.०५.२००७ रोजी त्यांचा वैद्यकिय अधिकारी म्हणुन १० वर्षांचा अनुभव होता व १०० पेक्षा जास्त एम.एल.सी. केसेस त्यांनी हाताळल्या होत्या. दि.०८.०५.२००७ रोजी राजु माधव नरोटे व मिनकुबाई माधव नरोटे यांची तपासणी होवुन मिळण्याकरीता त्यांना पत्र मिळाले होते. ते पत्र नि.क्रं.३८ व ३९ वर असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. राजु माधव

नरोटे याला सकाळी ०९.०० वाजता पोलीस शिपाई लोमेश ढवळे ब.नं.२४१६ यांनी आणले होते. राजु माधव नरोटे यांने काठीने मारहाण झाल्याची हक्कीकत सांगीतली होती. त्याला डोक्यावर चिरल्याची जखम होती व त्या जखमेतुन रक्त येणे चालु होते. तसेच त्याच्या उजव्या हाताच्या कोप-यावर खरचटल्याची जखम होती. त्या जखमा ६ तासाच्या आतील होत्या. त्या जखमा कठिण वस्तुने झाल्या होत्या व सहा ते आठ दिवसात भरून येणा-या होत्या. त्यांनी सदर दुखापतीबाबत नि.क्रं.४० प्रमाणे प्रमाणपत्र दिले. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. मिनकुबाई माधव नरोटे हिला सकाळी ९. १५ वाजता पोलीस शिपाई लोमेश ढवळे यांनी आणले होते. तिने काठीने मारहाण झाल्याची हक्कीकत सांगीतली होती. तिला डोक्यावर रक्त जांभल्याची व खरचटल्याची जखम झालेली होती. त्या जखमेच्या बाजुला सुज आलेली होती. तसेच तिला उजव्या हाताला किरकोळ खरचटल्याची जखम होती. त्या जखमा बारा तासाच्या आतील होत्या व कठिण वस्तुने झालेल्या होत्या. त्या जखमा सहा ते आठ दिवसात भरून येणा-या होत्या. त्या प्रमाणे त्यांनी नि.क्रं.४१ प्रमाणे वैद्यकिय प्रमाणपत्र दिले. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. दि.३०.०८.२००७ रोजी त्यांना हत्याराबाबत अभिप्राय मिळण्यासाठी पत्र मिळाले होते. ते नि.क्रं.४२ वर असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांच्या समोर बांबुची काठी हजर करण्यात आली होती. त्या बांबुच्या काठीची लांबी ५६ इंच व व्यास ४ इंच होता. त्या काठीला पाच गाठी होत्या. नि.क्रं.४० व ४१ मध्ये नमुद दुखापती वस्तुचिन्ह अ वरील बांबुच्या काठीने होवु शकतात असा अभिप्राय त्यांनी दिला.

आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, नि.क्रं. ४० व ४१ मधील नमुद दुखापती या एखादा व्यक्ती कच्च्या जागेवर पडल्यास होवु शकतात. सदर साक्षीदाराने पोलीसांच्या सांगण्यावरून खोटे प्रमाणपत्र दिल्याची सुचना नाकारली आहे.

**१०.** साक्षीदार क्रं.४ जयभद्र तानुजी आलाम यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, दि.०९.०५.२००७ रोजी ते पोलीस मदत केंद्र घोट येथे पोलीस हवालदार म्हणुन कार्यरत होते. गुन्हा क्रमांक ७०/२००७ चा तपास त्यांना दाखल झाल्यानंतर प्राप्त झाला. तपासकामी त्यांना जप्तीपत्रक, घटनास्थळ पंचनामा प्राप्त झाले. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. आरोपीने फिर्यादीच्या डोक्यावर काठीने मारहाण करून दुखापत केली असे तपासात निष्पन्न झाले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सदर साक्षीदाराने बचावाच्या सुचना नाकारल्या आहेत.

**११.** तपासिक अधिकारी साक्षीदार कं.५ दौलत नारायण नागपुरे यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, दि.०९.०५.२००७ रोजी ते पोलीस मदत केंद्र, घोट येथे सहायक फौजदार म्हणुन कार्यरत होते. अपराध कं.७०/२००७ चा तपास त्यांना त्याच दिवशी सोपविण्यात आला. त्यांना तपास मिळाल्यानंतर ते भिमनबोडी येथे घटनास्थळ पंचनाम्यासाठी गेले. त्यांनी घटनास्थळाची पाहणी केली व दोन पंचांसमक्ष पंचनामा केला. घटनास्थळ हे फिर्यादीने दाखविले. आरोपी कं.२ हा घटनास्थळावर हजर होता. त्याला विचारले की, फिर्यादीला कोणत्या काठीने मारले. त्यांने काठी काढुन दिली. ती काठी पंचांसमक्ष जप्त केली व ताब्यात घेतली. त्याबाबत जप्तीपत्रक तयार केले. घटनास्थळ पंचनामा नि.कं.४५ वर त्यांची व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. जप्तीपत्रक नि.कं.४६ वर त्यांची व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांनी आरोपींना अटक केले. त्यांचा अटक फार्म भरला. अटक फार्म अनुक्रमे नि.कं.४७ व ४८ वर त्यांची व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांनी जप्त काठीबाबत अभिप्राय मिळण्यासाठी पत्र पाठविले. नि.कं.४२ वरील पत्र तेच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यांनी आरोपीला तपासणीसाठी पाठविले. आरोपीने गुन्हा केल्याचे तपासावरून निष्पन्न झाले. काठी वस्तुचिन्ह अ सदर साक्षीदाराने ओळखली. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात सदर साक्षीदाराने बचावाच्या सुचना नाकारल्या आहेत.

**१२.** सरकारी वकील श्री.एस.एम. सलामे यांनी नमुद केले की, साक्षीदार कं. १ व २ हे या प्रकरणातील जखमी साक्षीदार आहेत. साक्षीदार कं.१ व २ हे आरोपी कं.१ चे भाउ व सावत्र आई आहेत. साक्षीदार कं.१ व २ यांचा पुरावा नाकारण्यास व त्यांच्या पुराव्यावर अविश्वास दाखवण्यास बचाव पक्षातर्फे ठोस कारण देण्यात आलेले नाही. साक्षीदार कं.१ ते ५ यांच्या पुराव्यावरून आरोपीविरूध्दचा गुन्हा संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होतो. त्यामुळे आरोपीला दोषी धरून शिक्षा करण्यात यावी अशी विनंती केली.

**१३.** आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. ए.जे. उंदिरवाडे यांनी युक्तीवाद केला की, साक्षीदारांचा पुरावा विश्वसनीय नाही. साक्षीदारांच्या पुराव्यात विसंगती असुन शंका निर्माण करणा-या आहेत. त्यामुळे आरोपीला निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली.

**१४.** अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले. उभय पक्षांचा युक्तीवाद विचारात घेतला. साक्षीदार कं.१ व २ यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले आहे की, आरोपीने त्यांना बांबुच्या काठीने डोक्यावर मारून दुखापत केल्या. साक्षीदार कं. ३ हे

वैद्यकिय अधिकारी असुन त्यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले आहे की, त्यांनी दि.०८.०५.२००७ रोजी साक्षीदार क्रं. १ व २ यांना तपासले होते व साक्षीदार क्रं.१ व २ यांना डोक्यावर दुखापती झालेल्या होत्या, त्याप्रमाणे त्यांनी नि.क्रं.४० व ४१ वरील दुखापतीचे प्रमाणपत्र दिले. नि.क्रं.४० व ४१ वरील दुखापतीचे प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता त्यात नमुद दुखापती या साक्षीदार क्रं.१ व २ यांनी त्यांच्या तोंडी पुराव्यात दिलेल्या जखमांचे वर्णनाप्रमाणे जुळुन येतात. साक्षीदार क्रं. ५ यांनी या गुन्हयातील हत्यार वस्तुचिन्ह अ वरील बांबुची काठी जप्त केल्याचे कथन केले आहे. साक्षीदार क्रं.३ यांनी नि.क्रं.४० व ४१ मध्ये नमुद जखमा वस्तुचिन्ह अ वरील काठीने होवु शकतात असा अभिप्राय नि.क्रं.४३ प्रमाणे दिला आहे. साक्षीदार क्रं. १ व २ यांच्या तोंडी पुराव्याला साक्षीदार क्रं.३ यांच्या वैद्यकिय पुराव्याने बळकटी मिळते. साक्षीदार क्रं.१ ते ५ यांच्या पुराव्यावरून आरोपी क्रं.१ यांनी साक्षीदार क्रं.१ व २ यांना बांबुच्या काठीने मारहाण करून साधी दुखापत केल्याचे शाबीत होते. साक्षीदार क्रं. १ ते ५ यांच्या पुराव्यावर अविश्वास दर्शविण्यासाठी ठोस कारण नाही. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेला बचाव संभाव्य वाटत नाही. म्हणुन मी मुद्दा क्रं.१ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदविले आहे.

**१५.** आरोपी क्रं.१ याला भा.दं.वी. कलम ३२४ च्या गुन्हयासाठी दोषी धरले आहे. उभय पक्षांचे शिक्षेबाबत म्हणणे विचारात घेतले. आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. ए.जे. उंदिरवाडे यांनी नमुद केले की, आरोपीचा हा पहिलाच अपराध असुन आरोपीला ताकिद देवुन अपराधी परिविक्षा अधिनियम प्रमाणे लाभ देवुन सोडण्यात यावे. सरकारी वकिलांनी नमुद केले की, आरोपीने गंभीर गुन्हा केला आहे. आरोपीची गुन्हा करण्याची पध्दत विचारात घेता आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियम प्रमाणे लाभ देवुन सोडल्यास समाजात धाक निर्माण होणार नाही. अपराधी परिविक्षा अधिनियम प्रमाणे लाभ देण्यासाठी परिविक्षा अधिकारी यांचा अहवाल मागविण्यात आलेला नाही. त्यामुळे आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियम प्रमाणे लाभ देवु नये अशी विनंती केली. आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा देवुन साक्षीदारांना आरोपीकडुन नुकसान भरपाई देववावी. सरकारी पक्षाचा शिक्षेबाबत युक्तीवाद विचारात घेता आरोपीला अपराधी परिविक्षा अधिनियम प्रमाणे लाभ देणे उचित होणार नाही. आरोपीचा पहिलाच गुन्हा दिसतो. भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ प्रमाणेच्या गुन्हयासाठी कैदेची व दंडाची शिक्षा करण्याचा विवेकाधिकार या न्यायालयास आहे. आरोपी हा दि.१६.०५.२०२५ पासुन या खटल्याचे कामी अभिरक्षेत आहे व सदर अभिरक्षेत घालवलेल्या कालावधी पुरती कैदेची शिक्षा आणि दंडाची शिक्षा करणे न्यायोचित होईल. सबब मुद्दा क्र.२

**न्यायनिर्णय नि.क्र.५२**

साठी खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१ आरोपी क्रं.१ विनायक माधव नरोटे, रा. भिमनबोडी, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली यास भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ अन्वयेच्या गुन्हयासाठी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(२) नुसार दोषी धरण्यात येते.

२. आरोपी क्रं.१ विनायक माधव नरोटे, रा. भिमनबोडी, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली यास भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ अन्वयेच्या गुन्हयासाठी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(२) नुसार १० महिने व १५ दिवस कैदेची शिक्षा व रक्कम रूपये ३,०००/- दंडाची शिक्षा करण्यात येते. आरोपीने दंडाची रक्कम भरण्यास कसुर केल्यास आरोपीला दोन महिने साध्या कारावासाची शिक्षा करण्यात येते.

३. आरोपीने दंडाची रक्कम भरल्यास दंडाच्या रक्कम रूपये ३,०००/- त्यातुन साक्षीदार क्रं.१ राजु माधव नरोटे याला रक्कम रूपये १५००/- नुकसान भरपाई पोटी देण्यात यावे व साक्षीदार क्रं.२ मिनकुबाई माधव नरोटे हिला रक्कम रूपये १५००/- नुकसान भरपाई पोटी देण्यात यावे.

४. आरोपी क्रं.१ याने प्रस्तुत गुन्हयाचे कामी अभिरक्षेत घालवलेला कालावधीसाठी आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४२८ नुसार शिक्षेतुन सुट देण्यात यावी.

५. जप्त मुददेमाल बांबुची काठी मुल्यरहीत असल्याने अपील कालावधी संपल्यानंतर ती नाश करण्यात यावी.

६. या न्यायनिर्णयाची प्रत आरोपी क्रं.१ याला विनामुल्य देण्यात यावी.

७. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by YOGESHWAR VALVI
Date: 2026.03.31 17:10:59 +0530

दिनांक :-३१/०३/२०२६.

{वाय. जे. वळवी}
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.

# <u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. न्यायनिर्णयामधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव : सुचित निलंकठ खांडेकर
लघुलेखक (श्रेणी-३)

न्यायालयाचे नाव : दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चामोर्शी

न्यायानिर्णयाची तारीख : ३१/०३/२०२६

मा. पिठासीन अधिकारी यांनी

न्यायनिर्णयावर सही केल्याची तारीख : ३१/०३/२०२६

न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख : ३१/०३/२०२६